N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

**प्रथम खबर अहवाल**

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** लातूर **P.S.(ठाणे):** वाढवणा **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0183 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/10/2021 20:38 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार — **Date From (दिनांक पासून):** 20/10/2021

**Time Period (कालावधी):** पहर 5 — **Date To ( दिनांक पर्यंत):** 20/10/2021

**Time From (वेळेपासून):** 14:05 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:05 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ): 20/10/2021** **Time (वेळ): 20:38 बजे**

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 022 **Date & Time (दिनांक आणि वेळ): 20/10/2021 20:38 बजे**

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 11 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** शिवाजी चौक हंडरगुळी , हटेल साई टी हाउस हंडरगुळी येथे,उदगीर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** दयानंद साळुराम कांबळे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1974 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा हंडरगुळी ता उदगीर ,वाढवणा,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा हंडरगुळी ता उदगीर ,वाढवणा,लातूर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9403625842

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रहिम पापामिय शेख पद-तंत्रज्ञ वर्ग 4 | | | 1. चापोली,चाकुर,चाकुर,लातूर,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम 2500 | 2,500.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 2,500.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 20/10/2021मी दयानंद साळुराम कांबळे वय 47 वर्शे, व्यवसाय मजुरी रा. हंडरगुळी ता. उदगीर जि. लातूर मो.नं. 9403625842समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन मी मजुरी करून कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत आहे. मी काल दिनांक 19/10/2021 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर चे पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब यांना फोनवर संपर्क करुन एका लोकसेवका विरुध्द लाच मागणीची माझी तक्रार असल्याचे सांगुन मी त्यांना उदया दिनांक 20/10/2021 रोजी चिमाची वाडी फाटया जवळ येण्यास सांगीतले होते.त्याप्रमाणे मी आज दिनांक 20/10/2021 रोजी सकाळी 09.00 वा. सुमारास मी माझे घरी असताना असताना मला पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब यांनी माझ्या मोबाईलवर फोन करुन विचारणा केली असता मी त्यांना चिमाची वाडी फाट्याजवळ आलो असे सांगीतले. त्याप्रमाणे पोलीस उपअधीक्षक रेजितवाड हे त्यांचे वाहनाने सदर ठिकाणी त्यांच्या सोबत असलेल्या कर्मचा-यासह हजर होवुन त्यांनी मला सापळा पथकातील सदस्य व पंचाची ओळख करून देवुन माझे नांव गांव विचारले असता मी त्यांना माझे नाव वरीलप्रमाणे सांगुन माझी तोंडी तक्रार सांगुन सविस्तर लेखी तक्रार दिली ती खालील प्रमाणे. मी मौजे हंडरगुळी गावाचा रहिवाशी असून मी दि. 16/10/2021 रोजी माझे घराचे विद्यूत मीटर कनेक्षन घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज केला आहे. त्याचे कागदपत्रे घेवून मी त्याबाबत आमचे गावचे लाईनमन यांना हाळी येथे त्यांच्याकडे जावुन सदर कामाचा पाठपुरावा केला असता, त्यांनी तुमचे संबंधीत कागदपत्रे बरोबर नाहीत त्याला 100 रुपयाचा बंन्ड लागतो कागदपत्रे पूर्ण लागतात तुमच्या वडीलांचे चुलत्यांचे नावावंर या अगोदर थकबाकी आहेत आणि जर तुम्हाला नवीन कनेक्षन पाहीजे असेल तर त्याकामासाठी 2500/-रूपये द्यावे लागतील अषी लाचेच्या रकमेची मागणी केलेली आहे. तरी संबंधीत कामाच्या अनुशंगाने लोकसेवक शेख यांनी केलेली लाचेची मागणीप्रमाणे लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसुन मी त्यांना कुठलीही थकबाकी देणे नाही. मी आजरोजी पुन्हा लोकसेवक शेख यांची भेट घेवुन संबंधीत कागदपत्रे त्यांना दाखवून विद्युत मीटर कनेक्षन बाबत मागणी करणार असुन पुन्हा त्यांनी स्वतः अगर इतरामार्फत लाचेची मागणी केल्यास संबंधीतांवर लाचेची कार्यवाही करण्यात यावी. तसेच माझे कामाचे अनुशंगाने ऑनलाईन दाखल केलेली पावती झेरक्स आपल्याकडे प्रत सादर करीत आहे. तसेच माझेशी त्यांचा कुठल्याही प्रकारचा आर्थीक तथा देवाण घेवाणीचा व्यवहार झालेला नाही. अषा आषयाची लेखी तक्रार दिली. मी दिलेली तक्रार व कामाच्या कागदपत्राची झेरक्स प्रत वर पोलीस उपअधीक्षक रेजितवाड व पंचानी वाचुन पाहुन त्यावर स्वाक्ष-या केल्या आहेत.पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने लाईनमन शेख यांनी मला माझ्या वर नमुद केलेल्या कामासाठी लाचेची मागणी केली आहे. अगर कसे ? यांची पडताळणी करुन ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकर्डर बाबत मला व पंचांना माहिती सांगुन व ते कोरे असल्याचे खात्री करुन देवुन डिजीटल व्हईस रेकर्डरमध्ये सिलबंद पाकीटातील नविन कोरे मेमरी कार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन

पडताळणी करण्याचे ठरवुन सापळा कार्यवाही बाबत मला व पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही सर्वजन सदर ठिकाणाहुन शासकीय वाहनाने हंडरगुळी येथील नदीच्या पुलाजवळ आलो.पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब यांनी पोक 1400 कच्छवे यांचे मार्फतीने 12.22 वा. डिजीटल व्हईस रेकर्डचे बटन चालु करुन माझ्या गळ्यात आडकावुन मी व पंच क्रमांक 1 निकम असे माझ्याकडे असलेल्या वाहनाने ग्रामपंचायत कार्यालय, हंडरगुळी येथील हटेल शेजारी जावुन तिथे गोरा खाकी शर्ट व पन्ट घातलेला ईसम हा शेख असल्याचे सांगुन ईषा-याने सांगुन त्यांची पंचासमक्ष भेट घेतली असता त्यांनी आमच्या सोबत कार्यालयाच्या बाहेर येवुन माझ्या वरील नमुद कामाच्या अनुशंगाने चर्चा केली असता लाईनमन शेख म्हणाले की पुरे थकबाकी है वोच नाम पे ले रह है मिटर अभी परेशानी एक तो बिल भरना नही कुछ नहीं कुछ....जोडेंगे असे म्हणाले असता मी त्यांना साहेब थोड खाली या बोला जावूत त्यावर लोकसेवक कह जानेका.. त्यावर मी जावूत आता तीं बंड काय करावं आता.. त्यावर लोकसेवक रहनेदो अब क्या लाते है देते है इसपेच तुम लाते कभी तो और दो साल जाते है त्यावर मी लोकसेवकाने मागणी केल्याप्रमाणे किती रुपये द्यायचे त्याला लोकसेवक देव कित्ते भी.. मी आहो या जरा खाली बोला.. लोकसेवक अरे ओ क्या शरमानेका देव जो देना है देव क्या उसका देव तुम क्या देते तुम देव.. त्यावर मी किती देवू सांगा मला .. घरीत खिशात... त्यावर लोकसेवक तुम्हार को बोला था ना.. आडी हजार रुपये दयेव बोलके.. त्यावर मी हं अडीच हजार.. असे म्हणाले असता त्यावर मी त्यांना थोड्या वेळात घेवुन येतो म्हणुन मी व पंच क्रमांक 1 निकम असे हंडरगुळी नदीचे पुलावर 12○:40 परत आलो येथे थांबविण्यात आलेल्या सापळा पथकाच्या वाहनाजवळ गेलो असता माझ्याकडील व्हईस रेकर्डर पोक/1400 कच्छवे यांच्याकडे दिले असता ते त्यांनी बंद केले. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक 1 निकम यांना लाचेची मागणीच्या अनुशंगाने माझ्यात व लाईनमन शेख यांच्यात काय बोलने झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 निकम यांनी मी वर नमुद केल्या प्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही सर्वांनी व्हईस रेकर्डर हाताळणारे पोलीस कर्मचारी कच्छवे यांचे मार्फतीने डिजीटल व्हईस रेकर्डर चालु करुन माझ्यात व लाईनमन शेख यांच्यात झालेले संभाशण ऐकुन ते पंच क्रमांक 1 यांनी सांगितलेल्या हकीकती प्रमाणे असल्याचे खात्री करुन लाईनमन शेख यांनी माझ्या वर नमुद कामासाठी माझ्याकडे 2500/-रुपये लाचेची स्वतः मागणी करून सदर लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगितल्याने त्यांचे विरुध्द लाचेची सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांनी मला लाईनमन शेख यांना देण्यासाठीं लाचेची रक्कम हजर करणे बाबत कळविले असता मी माझेकडील 500/-रुपये दराच्या 05 चलनी नोटा असे एकुण 2500/-रुपये समक्ष हजर केले. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांनी मला व पंचाना अन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक करुन दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना पोना 1253 गिरी यांनी अन्थ्रासीन पावडर लावुन माझ्या शर्टच्या छातीवरील डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन लाचेची रक्कम दिल्यानंतर आपल्या खिशातील रूमाल हाताने काढुन चेह-यावर फिरवण्याचा सुनियोजीत ईशारा म्हणुन सांगण्यात आला. पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवाही बाबत पुन्हा सुचना दिल्या.सदर ठिकाणावरून वाहनाने निघुन हंडरगुळी शिरुरताजबंद रोडवरील नदीचे पुलाचे समोर येवून आडबाजूस आल्यानंतर पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांच्या सुचनेनुसार पोलीस कर्मचारी कच्छवे यांनी व्हाईस रेकर्डर 13.59 वा. चालु करुन माझ्या गळ्यात आडकावुन दिले त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 निकम असे वाहनामधुन उतरुन पायी चालत शिवाजी चौक हंडरगुळी येथे साई टी हाउस येथे बोलावल्या प्रमाणे तिथे जावुन लाईनमन शेख त्यांचेकडे माझ्या कामाबाबत चर्चा करून मी त्यांना बोलल्याप्रमाणे मी वडीलांची थकबाकी, भावाची थकबाकी काही म्हणू नका माझे नावावर माझं मला द्या त्यावर लोकसेवक ठिक है... मला त्याच्या हाताच्या अंगठयाने तर्जनीवर घर्षन करुन इषा-याने पैशाची मागणी करत, वो कागदं तुम्हारे... असे म्हणाल्याने मी अं म्हणत माझे शर्टच्या छातीवरील डाव्या बाजुच्या खिशातील अन्थ्रासीन पावडरयुक्त 2500/-रुपये (ज्यात 500/-रुपये दराच्या 05 चलनी नोटा ) लाचेची रक्कम लोकसेवक षेख यांचे पुढे धरली असता त्यांनी त्यांचे उजव्या हाताने सदरची अन्थ्रासीन पावडरयुक्त 2500/-रुपये (ज्यात 500/-रुपये दराच्या 05 चलनी नोटा ) लाचेची रक्कम स्वीकारुन त्याच्या पन्टच्या मागील उजव्या खिशातील पकेटमध्ये ठेवली. लाचेची रक्कम देवून मी हटेलच्या बाहेर येवुन नियोजीत लाचस्विकृतीचा इशारा केला. पोलीस उपअधीक्षक रेजितवाड व पंच क्रमांक 2 पाटील व सापळा पथकातील सदस्य सदर ठिकाणी आले. माझाकडील व्हाईस रेकर्ड पोलीस कर्मचारी कच्छवे यांचेकडे दिले ते त्यांनी घेवुन बंद केले. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांनी पंच क्रमांक 1 निकम यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 यांनी समोर हटेलमध्ये बाकावर बसलेल्या खाकी कपडे घातलेल्या ईसमाकडे हात करुन हे लाईनमन लोकसेवक शेख असुन त्यांनी मागणी केलेली 2500/-रुपये लाचेची रक्कम ही त्यांच्या समोर घेवून लोकसेवक शेख यांनी त्यांच्या खाकी पंन्टच्या मागील उजव्या खिशातील पकेटमध्ये ठेवली आहे. मी वर सांगीतलेल्या हकीकती प्रमाणे मिळती जुळती हकीकत पंच क्रमांक 1 निकम यांनी सांगीतली त्यावेळी पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांनी त्यांचेकडील ओळखपत्र लाईनमन शेख यांना दाखवून त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नांव रहिम पापामिय शेख वय 30 वर्शे, पद तंत्रज्ञ वर्ग 4, नेमणुक महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत षाखा हाळी उपविभाग शिरूर ताजबंद ता. उदगीर जि. लातूर रा. चापोली ता.चाकुर जि. लातूर ह.मु. हंडरगुळी ता. उदगीर जि. लातूर असे असल्याचे सांगितले. पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांनी पंच क्रमांक 2 पाटील यांचे हस्ते लाईनमन षेख यांच्या जवळील खाकी पंन्टच्या मागील उजव्या खिशातील पकेट मधुन लाचेची रक्कम काढुन घेवुन पंच क्रमांक 1 निकम यांचे मार्फतीने सापळा कार्यवाही दरम्यान लिहुन घेण्यात आलेल्या नोटांचे वर्णन व नंबरशी पडताळून पाहीले असता ते एकच असल्याचे निदर्षनास आले. त्यानंतर तेथील आवश्यक ती सापळा कार्यवाही करुन सदर ठिकाणी गर्दी होत असल्याने पोलीस उपअधीक्षक रेजितवाड यांनी पुढील कार्यवाही करणे करिता लाईनमन शेख यांना सोबत घेवून घटनास्थळावरुन रवाना होवून पोलीस स्टेशन वाढवणा येथे येवून पुढील कार्यवाही पुर्ण केली.तरी यातील लोकसेवक रहिम पापामिय शेख वय 30 वर्शे, पद तंत्रज्ञ वर्ग 4, नेमणुक महाराष्ट्र राज्य विद्युत वितर कंपनी मर्यादीत शाखा हाळी उपविभाग शिरूर ताजबंद ता. उदगीर जि. लातूर रा. चापोली ता. चाकुर जि. लातूर ह. मु. हंडरगुळी ता. उदगीर जि. लातूर यांनी मी ऑनलाईन सादर केलेले घरगुती विद्युत मीटर कनेक्षन जोडून देण्यासाठी परीपूर्ण कागदपत्रे नसल्याने त्यामध्ये काही एक त्रुटी न काढता मदत करुन माझे घरी विद्युत मीटर कनेक्षन जोडण्याच्या कामाकरीता पंचासमक्ष माझ्याकडे 2500/-रुपये लाचेची रक्कम स्वतः मागणी करुन आज दिनांक 20/10/2021 रोजी शिवाजी चौक हंडरगुळी हटेल साई टी हाउस हंडरगुळी येथे सदर लाचेची रक्कम स्वतः 14.05 वाजता पंचासमक्ष स्विकारली आहे. म्हणुन माझी आरोपी विरुध्द कायदेशीर तक्रार आहे.मी वर नमुद प्रमाणे सांगितलेली तक्रार ही पोना गिरी यांनी लपटपवर टंकलिखीत केली असुन त्यांची प्रींट काढल्यानंतर ती मी वाचुन पाहिली ती मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): NAUSHAD PASHA PATHAN(I (Inspector)) / 15101000402NPPM861T **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer incharge, Police Station**
**Name** (नाव): NAUSHAD PASHA PATHAN
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 15101000402NPPM861T